मंगळवार, २९ मार्च २०२२

# राम प्रहर

◆ वर्ष १४ ◆ अंक २५०
www.ramprahar.com

◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## उन्हाळी सुट्ट्या रद्द! शिक्षण विभागाचा निर्णय



**मुंबई :** विद्यार्थ्यांना दरवर्षी उन्हाळ्यात सुट्ट्या मिळत असतात, मात्र यंदा एप्रिलमध्येही विद्यार्थ्यांना शाळेत जावे लागणार आहे. शिक्षण विभागाने घेतलेल्या निर्णयानुसार एप्रिलमध्ये विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या उन्हाळी सुट्ट्या आता विद्यार्थ्यांना मिळणार नाही. अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला असून, सुट्ट्या रद्द करण्यात आल्या आहेत. कोरोना काळात जवळपास दोन वर्षे शाळा बंद होत्या. याचा शिक्षण क्षेत्राला मोठा फटका बसला. अनेक ठिकाणी शिक्षकांना अभ्यासक्रम पूर्ण करता आला नाही. त्यामुळे आता उन्हाळ्याच्या सुट्ट्या रद्द करण्याचा निर्णय राज्य शासनाच्या शिक्षण विभागाने घेतल्याचे समजतेय. एकीकडे तापमान वाढत असताना विद्यार्थ्यांना शाळेत पाठवावे लागणार असल्याने पालकांची मात्र चिंता वाढली आहे.

अंतरंग

आता तरी कामाला लागा; भाजपचा मुख्यमंत्र्यांना सल्ला/२

संपकरी कर्मचाऱ्यांकडून राज्य सरकारचा अनोखा निषेध/५

स्विस खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत सिंधूला विजेतेपद/६

# ठाकरेंचे मविआ सरकार सर्वार्थाने अपयशी

**मुंबई : प्रतिनिधी**

**शेती आणि शेतकरी, वीज, शिक्षण क्षेत्र तसेच विविध खात्यासाठी मंत्र्यांना निधीवाटपात झालेला असमतोल या सारख्या महत्त्वाच्या मुद्यांसह इतर मुद्यांवरही राज्यातील सर्व स्तरांवरील नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यात राज्य सरकारमध्ये सामिल असलेल्या तिन्ही राजकीय पक्षांना अपयश आले आहे. आता शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस पक्षाने परस्परांबाबत जाहीर नाराजी व्यक्त करायला सुरुवात केली आहे.**

महाराष्ट्राच्या विधिमंडळ अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे तीनच दिवसांपूर्वी सुप वाजले. अधिवेशन काळात विरोधी पक्षनेत्यांनी सत्ताधाऱ्यांना अनेक मुद्यांवरून धारेवर धरले आहे. याच पार्श्वभूमीवर आता राज्य सरकार राज्यातील नागरिकांचे महत्त्वाचे प्रश्न सोडविण्यात अनेक बाबतीत अपयशी ठरले असल्याचे स्पष्ट झाले आहे.

गेले अनेक महिने संपावर गेलेली एसटी आजपर्यंत सुरळीत झालेली नाही. या संपाची झळ बसल्याने अनेक एसटी कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यातच राज्यातील वीज कर्मचारी संपावर जात आहेत. वर्षभरात वातावरण बदलाचा शेती व्यवसायावर मोठा परिणाम झाला. त्यामुळे कंबरडे मोडलेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाईसाठी अजूनही वाट पहावी लागत आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर एसटी आणि वीज कर्मचारी, शेतकरी नाराज असतानाच आणि राज्यातील अनेक गरीबांच्या डोक्यावर छप्पर नसताना ठाकरे सरकारने तर आता थेट आमदारांनाच मोफत घरे देण्याचा निर्णय घोषित केल्याने सर्व स्तरांतून तीन पक्षांच्या मोटकुळीने बनलेल्या ठाकरे सरकारवर त्यांच्या महाविकास आघाडीतील आमदारांसह सामान्य नागरिकांकडून सडकून टीका होत आहे.



## राज्यावर मोठे वीज संकट; ऊर्जामंत्र्यांकडून कबुली

**नागपूर : प्रतिनिधी**

वीज कर्मचाऱ्यांच्या संपामुळे राज्यांमध्ये वीज संकट उद्भवल्याचे राज्याचे ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी मान्य केले आहे. राज्यातील सात औष्णिक विद्युत केंद्रापैकी पाच औष्णिक विद्युत केंद्रांमध्ये फक्त दोन दिवस पुरेल इतकाच कोळसा साठा शिल्लक आहे. त्यामुळे राज्य सरकारने आधीच नियोजन न केल्याने हे संकट उद्भवले का याबद्दल आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.



राज्याचे ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी स्वतः मान्य केले की केंद्र व राज्य सरकारच्या वीज कर्मचाऱ्यांच्या संपामुळे राज्यातील कोळसा पुरवणारी साखळी खंडीत झाली. त्यामुळे राज्यावर विजेचे संकट आले आहे, मात्र याला जबाबदार कोण हा खरा प्रश्न आहे. वीज कर्मचाऱ्यांनी संप मागे घ्यावा यासाठी माझी त्यांच्यासोबत चर्चा सुरू आहे. एक पाऊल त्यांनी मागे जावे एक पाऊल मी पुढे येतो, अशीदेखील विनंती नितीन राऊत यांनी केली.

राज्यात एका दिवसाला जवळपास वीस हजार मेगावॅट विजेची गरज असते. त्यापैकी सहा हजार मेगावॅट ही महानिर्मिती पुरवते, सात हजार मेगावॅट वीज एनटीपीसीकडून घेतली जाते, सात हजार मेगावॅट ही खाजगी वीज निर्मिती कंपन्यांकडे घेतली जाते, मात्र महानिर्मिती व एनटीपीसीचा कोळसा पुरवठा संपामुळे खंडीत झाला असल्याने हे संकट उद्भवले आहे.

## शेतकऱ्यांच्या पदरीही निराशा | राज्य सरकारकडून ना बोनस ना मदत

**मुंबई : प्रतिनिधी**

निसर्गाच्या लहरीपणामुळे यंदा धान्य उत्पादनात मोठी घट झाली आहे. अधिकचा खर्च होऊनही अपेक्षित उत्पादन शेतकऱ्यांच्या पदरी पडलेले नाही. अशा प्रतिकूल परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळणे क्रमप्राप्त होते, मात्र राज्य सरकारकडून शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचे पैसे मिळालेले नाही. तब्बल सहा लाख शेतकऱ्यांना राज्य सरकारने झटका दिला आहे.



हमीभावावर ७०० रुपयांचा बोनस शेतकऱ्यांना देण्याचा नियम आहे. यंदाच्या खरिपातील बोनस अद्यापही शेतकऱ्यांना मिळालेला नाही. बोनस की एकरी मदत यामध्ये राज्य सरकारने वेळ मारून नेली आहे. किमान आधारभूत किंमतीवरील बोनसकडे सरकारचे दुर्लक्ष होत आहे. विधीमंडळात या प्रश्नावर चर्चा झाली मात्र, तोडगा निघाला नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संताप आहे. २० मार्चपर्यंत केवळ १३.३६ लाख मेट्रिक टन धानाची खरेदी झाली आहे, जी गेल्या दोन वर्षांतील सर्वांत कमी आहे. येथील शेतकऱ्यांना १३ मार्चपर्यंत धानासाठी एमएसपी म्हणून दोन हजार ६०८ कोटी रुपये मिळाले आहेत, परंतु हे त्यांच्या उत्पादन खर्चापेक्षा कमी आहे.

शेतकऱ्यांनी भाताच्या एमएसपीवर किमान ७०० रुपये प्रति क्विंटल बोनसची मागणी केली होती, मात्र सरकारने आतापर्यंत एक रुपयाही दिलेला नाही. बोनस मिळत नसल्याने भंडारा, गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर, नागपूरचा काही भाग, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर येथील शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याची भावना होत आहे.

## एसटी संपाचा आणखी एक बळी

**जळगाव :** एसटीच्या संपामुळे अजून एका कर्मचाऱ्याने आपला जीव गमावला आहे. जळगाव जिल्ह्यातील यावल आगारात चालक म्हणून सेवारत असलेल्या कर्मचाऱ्याने, सोमवारी रेल्वेखाली आपली जीवनयात्रा संपवली आहे.

शिवाजी पंडित पाटील असे आत्महत्या करणाऱ्या एसटी कर्मचाऱ्याचे नाव आहे. ते तीन दिवसांपूर्वी त्यांच्या बहिणीकडे आले होते. एसटीचा संप सुरू असल्याने पगार मिळत नाही, असे त्यांनी बहिणीला सांगितले होते. अशातच सोमवारी त्यांनी आत्महत्या केली. आत्महत्या करण्यापूर्वी त्यांनी सुसाईड नोट लिहिली आहे. पोलिसांनी ती ताब्यात घेतली आहे.



### आमदारांना मोफत घरे देणे योग्य नाही

## खासदार शरद पवारांचा राज्य सरकारला घरचा आहेर

**मुंबई : प्रतिनिधी**

आमदारांना मोफत घरे देण्याचा महाराष्ट्र सरकारचा निर्णय चांगलाच वादग्रस्त ठरला आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी घेतलेल्या या निर्णयानंतर टीकेची झोड उठली आहे. या साऱ्या प्रकरणावर आता राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख व खासदार शरद पवार यांनी आपले मत मांडत महाविकास आघाडी सरकारला घरचा आहेर दिला आहे. खासदार शरद पवार यांनी या प्रकारे आमदारांना मोफत घरे देणे योग्य नाही, हा निर्णय चुकीचा असल्याचा त्यांनी निर्वाळा दिला आहे.

खासदार शरद पवार यांनी फक्त आमदारासाठी घर देण्याच्या निर्णयाला विरोध केला आहे. गृहनिर्माण योजनेमधील घरांमध्ये आमदारांसाठी कोटा ठेवावा, हे योग्य आहे असे त्यांनी म्हटलेय, मात्र ते ही त्या घरांची योग्य किंमत घेऊन ही घरे दिली पाहिजेत, असे त्यांनी म्हटलेय. या निर्णयाबाबत शरद पवार पक्षातील मंत्र्यांशी चर्चा करणार असल्याचे त्यांनी स्वत:चे सांगितले आहे.

राज्यातील आमदारांसाठी मुंबईत मोफत घरे देण्याची घोषणा केल्यानंतर अनेक जण राज्य सरकारच्या या निर्णयावर टीका करत आहेत. सरकारमधील नेत्यांकडूनदेखील या निर्णयाला विरोध होताना दिसत आहे.

## निवडक

### मेक्सिकोत गोळीबारामध्ये १९ जणांचा मृत्यू

**मेक्सिको :** सेंट्रल मेक्सिकोत गोळीबारात १९ जणांचा मृत्यू झालाय. रविवारी रात्री ही घटना घडली. गोळीबार कसा झाला याबाबत माहिती मिळू शकली नाही. टाऊन ऑफ लास-टिनाजास इथे एका उत्सवासाठी हजर असलेल्या लोकांवर हा गोळीबार झाला. यात १६ पुरुष आणि तीन महिलांचा मृत्यू झाला आहे.

### चीनमध्ये पुन्हा कडक लॉकडाऊनची घोषणा

**बीजिंग :** जगभरात कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाला जिथून सुरुवात झाली त्या चीनमध्ये आता पुन्हा एकदा या विषाणूने थैमान घालण्यास सुरुवात केली आहे. चीनमधील सर्वांत मोठे शहर असलेल्या शांघाईमध्ये कडक लॉकडाऊन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वाढत्या संसर्गामुळे शहरातील काही भागांमध्ये सोमवारपासून शुक्रवारपर्यंत लॉकडाऊन करण्यात येत आहे, असे शांघाईच्या स्थानिक प्रशासनाकडून सांगण्यात आलेय.

(छाया : लक्ष्मण ठाकूर)



## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शिवज हॉटेलचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई-गोवा महामार्गावरील तारा या गावाजवळ शिवज हे प्युअर व्हेज हॉटेल सुरू झाले आहे. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते या हॉटेलचे उद्घाटन झाले.

भाजपचे बुथ अध्यक्ष जितेंद्र पाटील आणि दिलीपशेठ जेना यांनी हा नवीन व्यवसाय सुरू केला असून, या हॉटेलचा उद्घाटन सोहळा रविवारी (दि. २७) आयोजित करण्यात आला होता. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते या हॉटेलचे उद्घाटन झाले. या वेळी त्यांनी जितेंद्र पाटील आणि दिलीपशेठ जेना यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

शिवज या हॉटेलच्या उद्घाटन सोहळ्यावेळी कोकण म्हाडाचे माजी अध्यक्ष बाळासाहेब पाटील, माजी नगराध्यक्ष परशुराम जितेकर, माजी नगरसेविका नीता माळी, यांच्यासह कर्नाळा विभागातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आदी उपस्थित होते तसेच या हॉटेलला उरणचे आमदार महेश बालदी यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या.

## राज्यसभेच्या १३ जागांसाठी निवडणूक

■ ३१ मार्च रोजी मतदान

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये पाचपैकी चार राज्यांमध्ये भाजपचा विजय झाला. आता राज्यसभेच्या १३ जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीसाठी कार्यक्रम जारी करण्यात आला आहे. यात १३ जागांसाठी ३१ मार्च रोजी मतदान होणार आहे. एकूण सहा राज्यांमध्ये राज्यसभेच्या या १३ जागांसाठी निवडणुका होतील.

यात आसाम (२ जागा), हिमाचल प्रदेश (१), केरळ (३), नागालँड (०१), त्रिपुरा (०१) तर पंजाबमधील पाच जागांचा समावेश आहे. आसाम, हिमाचल प्रदेश, केरळ, नागालँड आणि त्रिपुरामधून राज्यसभेच्या आठ सदस्यांचा कार्यकाळ दोन एप्रिल रोजी तर पंजाबमधील पाच सदस्यांचा कार्यकाळ ९ एप्रिलला पूर्ण होणार आहे.

## प्रमोद सावंत यांनी दुसऱ्यांदा घेतली गोव्याच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ

**पणजी : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी (दि. २८) प्रमोद सावंत यांचा मुख्यमंत्रिपदाचा शपथविधी सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला आहे. या सोहळ्यात भाजपचे नऊ मंत्री शपथबद्ध झाले आहेत.



यामध्ये वाळपईचे आमदार विश्वजीत राणे, मॉविन गुदिन्हो, फोंड्याचे आमदार रवी नाईक, नीलेश काब्राल, सुभाष शिरोडकर, रोहन खंवटे, गोविंद गावडे आणि अतानासिओ उर्फ बाबूश मोन्सेरात यांनी मंत्रिपदाची शपथ घेतली आहे. राज्यपाल पीएस श्रीधरन पिल्लई यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. या वेळी सावंत यांनी कोंकणी भाषेत शपथ घेतली.

दरम्यान, प्रमोद सावंत यांनी सलग दुसऱ्यांदा गोव्याच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे. शामाप्रसाद मुखर्जी स्टेडियममध्ये हा शपथविधी सोहळा पार पडला असून प्रमोद सावंत यांच्यासह इतर आठ जणांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. या सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह गृहमंत्री अमित शहा, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, भाजपशासित राज्यांचे मुख्यमंत्री आणि भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांच्यासह इतर अनेक दिग्गज नेत्यांनी हजेरी लावल्याचे पाहायला मिळाले.

## कामोठ्यातील मिसळ महोत्सवाची सांगता

■ आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे भाजपतर्फे भव्य मिसळ महोत्सव आयोजित करण्यात आला होता. चार दिवस सुरू असलेल्या या महोत्सवाची सांगता रविवारी (दि. २७) झाली. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देत महोत्सवाच्या आयोजकांचे कौतुक केले.

भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवी जोशी आणि युवा नेते हॅप्पी सिंग यांनी कामोठे पोलीस स्टेशन समोरील मैदानात २४ ते २७ मार्चदरम्यान भव्य मिसळ महोत्सव आयोजित केला होता. यात परिसरातील नागरिकांनी विविध मिसळींचा आस्वाद घेतला.




महोत्सवाच्या सांगते वेळी पनवेल मनपाच्या प्रभाग समिती 'क'च्या सभापती अरुणा भगत, नगरसेवक दिलीप पाटील, विजय चिपळेकर, गोपीनाथ भगत, विकास घरत, नगरसेविका कुसुम म्हात्रे, भाजपचे जिल्हा सरचिटणीस अविनाश कोळी, कामोठे शहर अध्यक्ष रवी जोशी, खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, सरचिटणीस दीपक शिंदे, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप भगत, युवा नेते हॅप्पी सिंग, जितू काटकर, सुशील शर्मा, युवा मोर्चा अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, शिख समाजाचे अध्यक्ष जसपाल सिंग सिंधु, हरविंदर कौर, पनवेल गुरुद्वारा अध्यक्ष सोनु सिंग, रश्मी भारद्वाज, साधना आचार्य आदी उपस्थित होते.

# मुख्यमंत्र्यांनी आघाडीबाबत फेरविचार करावा

## निधीवाटपावरून शिवसेना आमदाराची खदखद

**सोलापूर : प्रतिनिधी**

राज्यात महाविकास आघाडी सरकार चालवत असताना गेल्या अडीच वर्षांत शिवसेनेला दुय्यम वागणूक मिळत असून सरकारच्या अर्थसंकल्पातही हेच दिसून आले आहे. जेथे जेथे शिवसेनेची ताकद आहे, तेथे शिवसैनिकांचा दाबण्याचा प्रयत्न राष्ट्रवादी आणि काँग्रेसकडून होत आहे. जर अशाप्रकारे अन्याय होणार असेल तर शिवसेना पक्षप्रमुख म्हणून उद्धव ठाकरे यांनी आघाडीबाबत फेरविचार करायला हवा, असे परखड मत शिवसेनेचे माजी मंत्री, आमदार तानाजी सावंत यांनी व्यक्त केले.

सोमवारी सोलापुरात हुतात्मा स्मृतिमंदिरात आयोजित युवासेना मेळाव्यात सावंत बोलत होते. युवा सेनेचे सचिव वरूण सरदेसाई यांच्या उपस्थितीत हा मेळावा झाला. तानाजी सावंत यांनी राष्ट्रवादी आणि काँग्रेस यांच्यावर आक्रमक शैलीत टीकेचे बाण सोडले. राष्ट्रवादी आणि काँग्रेस दोघेही शिवसेनेबरोबर सत्तेत आहेत ना, तर मग शिवसेनेवर कशाला अन्याय करता? आम्हांला सत्तेत बसायची सवयच नाही. शिवसेना तर विस्थापितांचा गट आहे. तसे कोणी अजमावून पाहू नये. सरकारच्या अर्थसंपल्पातदेखील शिवसेनेला दुय्यम-तिय्यम स्थान मिळते. अर्थसंकल्पात ६०-६५ टक्के निधी राष्ट्रवादीला तर ३०-३५ टक्के निधी काँग्रेसला मिळतो. फक्त १६ टक्के एवढाच निधी शिवसेनेला मिळतो. त्यातही



उच्च व तंत्रशिक्षण खाते शिवसेनेकडे असल्यामुळे दहा टक्के निधी वेतनातच खर्च होतो. केवळ सहा टक्केच निधी विकास कामांसाठी शिवसेनेच्या वाट्याला येतो. राष्ट्रवादीचा सामान्य ग्रामपंचायतीचा सदस्यदेखील सरकारकडून एकेक कोटीचा निधी आणतो आणि आमच्या छातीवर बसून नाचतो, आम्ही शिवसैनिकांनी शिवभोजन थाळीवरच समाधान मानायचे. त्यातही पुन्हा बिले मिळण्यासाठी सहा सहा महिने वाट पाहायची, अशा शब्दांत सावंत यांनी खदखद जाहीरपणे प्रकट केली.

ते म्हणाले, महाविकास आघाडीत एकत्रपणे मांडीला मांडी लावून बसतात आघाडी धर्म पाळायच्या नुसत्या गप्पा मारल्या जातात. मात्र दुसरीकडे शिवसेनेची मुस्कटदाबी केली जाते. आम्ही केवळ आदेशाची वाट पाहतोय. जोपर्यंत सहन होईल, तोवर सहन करू. राष्ट्रवादी आणि काँग्रेसने आमच्या नादी लागू नये. तुम्ही आम्हाला शंभर मारले आणि मग आमचा एकच दणकट मार बसला की तुम्हांला आईचे दूध आठवेल, असा इशारा त्यांनी दिला.

राज्यात अनेक जिल्ह्यांमध्ये शिवसेनेची ताकद संपविण्याचा प्रयत्न दोन्ही काँग्रेसकडून होत आहे. कोल्हापूरमध्ये शिवसेनेचे राजेश क्षीरसागर हे यापूर्वी जेथून दोनवेळा निवडून गेले होते, त्या विधानसभा पोटनिवडणुकीसाठी क्षीरसागर यांना संधी मिळायला हवी होती. परंतु त्यांना डावलण्यात आले आहे. उस्मानाबादमध्ये शिवसेनेने यापूर्वी दोन्ही काँग्रेसची ताकद संपवून पाच-सहा आमदार निवडून आणले होते. आता त्याच उस्मानाबादमध्ये आघाडी असूनही दोन्ही काँग्रेसकडून शिवसेनेला दुय्यम दर्जाची वागणूक मिळते. अशी अनेक उदाहरणे देता येण्यासारखी आहेत, अशा शब्दांत सावंत यांनी आपली अस्वस्थता बोलून दाखविली.

# जेएनपीटीचे होणार आधुनिकीकरण

## गेट ऑटोमेशनपासून इंटर टर्मिनल ट्रान्सफर सिस्टीमची सुविधा; उत्पन्नातही वाढ



(प्रातिनिधीक छायाचित्र)

**उरण : वार्ताहर**

जेएनपीटीने ईझ ऑफ डुइंग बिझनेस अंतर्गत बंदरामधील पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्यास सुरुवात केली आहे. सर्व कामांचे डिजिटलायझेशन करण्यात येत आहे. गेट ऑटोमेशनसह सर्व टर्मिनल्सला जोडणारी इंटर टर्मिनल ट्रान्सफर सिस्टीम विकसित केली आहे. निर्यात कंटेनरसाठी थेट पोर्टमध्ये प्रवेश, थेट पोर्ट डिलीव्हरीसह आधुनिक सुविधा उपलब्ध करण्यात येत आहेत. त्यामुळे जेएनपीटी बंदराच्या कामकाजामध्ये सुधारणा होऊन उत्पन्नामध्येही वाढ होऊ लागली आहे.

मुंबई बंदरावरील ताण कमी करण्यासाठी शासनाने १९८९ मध्ये जेएनपीटी बंदर विकसित केले. तब्बल २९८७ हेक्टर जमिनीवरील हे बंदर सद्य:स्थितीमध्ये देशातील प्रमुख मालवाहतुकीचे केंद्र बनले आहे. २०२१ मध्ये येथून ७६.१४ दशलक्ष मालाची हाताळणी झाली होती. बंदराचे उत्पन्न १९२२ कोटींवर पोहचले होते. यावर्षी विक्रमी उत्पन्न होण्याची शक्यता आहे.

बंदराचे काम गतीने व्हावे यासाठी अनेक बदल केले जात आहेत. २७७ हेक्टर जागेमध्ये एसईझेड विकसित केले जात आहे. यामुळे व्यापाऱ्यांचा मालवाहतुकीचा खर्च कमी होणार आहे. एसईझेडमध्ये जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. एसईझेड व्यतिरिक्त डेडिकेटेल कोस्टल बर्थही विकसित केले आहे. यासाठी १७० कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. त्याची चाचणीही सुरू झाली आहे. कोस्टर बर्थवर १.५ दशलक्ष टन मालाची हाताळणी करता येणार आहे.

व्यावसायिक सुलभतेसाठी कंटेनर ट्रॅक्टर ट्रेलर्ससाठी पार्किंग प्लाझा विकसित केला आहे. ४५ हेक्टर जमिनीवर विकसित केलेल्या पार्किंग प्लाझामध्ये १५३८ कार्गो ट्रेलर्स पार्क करता येणार आहेत. जेएनपीटीमधील माल हाताळणी क्षमतेमध्येही वाढ करण्यात आली आहे. त्यासाठी २० मी. नैसर्गिक खोली असलेल्या नवीन बंदराचा विकास करण्याचा निर्णय घेतला आहे.

यासाठी वाढवण येथे जागा निश्चित केली आहे. जेएनपीटीचे अध्यक्ष संजय सेठी यांनी सांगितले की, ईझ ऑफ डुइंग बिझने अंतर्गत बंदराचा कायापालट करण्यात येत आहे. अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. याने बंदराच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे.

**महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरू**

*जेएनपीटीचे सेझ सह अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प सुरु आहेत. ६५ हजार कोटी रुपयांचा वाढवन प्रकल्प पोर्ट ऑफ सिंगापूर अथॉरिटीच्या भागीदारीत चौथे कंटेनर टर्मिनल विकसित केने जात असून, त्यामध्ये आठ हजार कोटींची गुंतवणूक असणार आहे. यामधील २.४ दशलक्ष टीईयू मालवाहतूक क्षमतेच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले असून, दुसरा टप्पा पूर्ण झाल्यानंतर प्रतिवर्षी २० दशलक्ष टीईयू मालवाहतूक करता येणार आहे. लिक्विड जट्टीसाठी १८२ कोटी, रस्ते रस्ते रुढीकरणासह इतर कामासाठी तीन हजार कोटींची गुंतवणूक करण्यात आली आहे.*

**ड्रायपोर्ट विकसित करणार**

*रेल्वे आणि रोडवाहतुकीच्या माध्यमातून बदराची अंतर्देशीय कनेक्टिव्हिटी मजबूत करण्यासाठी इंडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर व बदराकडे जाणाऱ्या रोडचे रुदीकरण केले जात आहे. याशिवाय कार्यो क्लिअरन्स व एकत्रिकरणासाठी जालना, वर्धा, नाशिक आणि सांगली यासारख्या महाराष्ट्राच्या अंतर्गत भागात हब एंड स्पोक मॉडेलवर आधारित ड्राय पोर्ट विकसित केला जाणार आहे.*



# आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून मते-पाटील कुटुंबीयांचे कौतुक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिवकर येथील मते-पाटील कुटुंबीयांच्या वतीने गावामध्ये करण्यात आलेल्या समाजोपयोगी उपक्रमाचे भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी कौतुक केले.

पनवेल तालुकयातील शिवकर गावातील मते-पाटील कुटुंबीयांनी सन २०१७ ते २०२१ पर्यंत विविध सामाजिक उपक्रमे राबवली आहेत. त्याची माहिती अमित पाटील, संतोष मते, चिंतामण पाटील, मछिंद्र मते आदी मते-पाटील कुटुंबीयांनी आमदार प्रशांत ठाकूर यांची सोमवारी (दि. २८) पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात सदिच्छा भेट घेऊन दिली. या सामाजिक कार्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर यांनी मते-पाटील कुटुंबियांना विशेष पुस्तक देऊन त्यांचा सत्कार केला तसेच त्यांना पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

अमित धर्मा पाटील यांचे वाढदिवस तसेच इतर औचित्य साधून शिवकर गावात विविध कार्यक्रमे आयोजित केले जातात. त्यामध्ये आतापर्यंत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंतीनिमित्त गणपती विसर्जन घाट लगतचे नदी पात्र स्वच्छ करण्यात आले. स्मशानभूमीची स्वछता, दिव्यांगांना जिल्हा रुग्नालयाकडून प्रमाणपत्र, स्मशानभूमीचा चौथरा कॉंक्रीटीकरण, महामार्गाजवळ स्वछता, सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी शौषखड्डे, एनएसएस शिबीर, लोकसभागतून वृक्षारोपण, कब्रस्थान स्वच्छता, ग्राम स्वच्छता अभियान, गावात सीसीटीव्ही व अंडरग्राउंड केबल आणि ग्रामपंचायतीला एलईडी स्क्रीन दिली आहे असे विविध समाजोपयोगी उपक्रम मते-पाटील यांनी राबविले आहेत.

# दिवाळे गावात स्मार्ट व्हिलेज अंतर्गत अनेक सेवासुविधा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

बेकायदा बांधकामांच्या हव्यासापोटी नवी मुंबईतील अनेक गावांचा उकिरडा झालेला असताना उत्तर बाजूस असलेले मच्छीमार बांधवांचे शेवटचे गाव दिवाळे विविध सेवा सुविधांमुळे कात टाकत आहे.

या गावातील ग्रामस्थांसाठी आतापर्यंत पाच जेट्टी बांधल्या असून मासळी सुकविण्यासाठी मोकळी जागा, स्वाध्याय सभागृह, समाज मंदिर, भव्य मासळी व भाजी बाजारहाट, एकाचवेळी शंभर वाहनांसाठी वाहनतळ, उद्यान, बॅण्ड पथकासाठी प्राशिक्षण केंद्र, विरुंगळा केंद्र, व्यायामशाळा, ग्रंथालय, गावाला वळसा घालणारे रिंग रोड, मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण कार्यालय, विविध कार्यक्रमांसाठी खुला रंगमंच अशा अनेक सुविधांनी हे गाव स्मार्ट होणार आहे. यासाठी येथील स्थानिक आमदार मंदा म्हात्रे यांनी आपला आमदार निधी या गावासाठी खर्च करण्याचा निर्णय घेतला आहे. मंगळवारी येथील काही सुविधांचा लोकार्पण सोहळा होणार आहे.

नवी मुंबईतील २९ गावांची दुरवस्था आहे. नवी मुंबईत गावे आहेत पण गावात नवी मुंबई नाही असे वर्णन येथील असुविधांबद्दल केले जाते. त्यामुळे गावांचा सर्वागीण विकास करण्याचे मंदा म्हात्रे यांनी ठरविले असून दत्तक गाव योजनेला सुरुवात केली आहे. यासाठी दिवाळे गावाची निवड करण्यात आली असून येथील प्रकल्पग्रस्तांनी या विकासाला साथ देण्याची तयारी ठेवली आहे. त्यामुळेच गावाचे प्रवेशद्वार विद्रूप करणारी दुकाने, फेरीवाले, गॅरेज, स्वयंप्रेरणेने हटवली आहेत. गावात स्वाध्याय परिवाराचे अनुयायी असल्याने स्वाध्याय सभागृह बांधण्यात आले आहे.

या गावातील ९० टक्के ग्रामस्थ हे मासेमारी किंवा मासेविक्री करीत आहेत. त्यामुळे खांदेवाले, फगवाले, डोलकर अशा तीन प्रकारांतील मच्छीमारांसाठी तीने वेगवेगळ्या जेट्टी बांधण्यात आलेल्या आहेत. याशिवाय गणेश विसर्जन, दशक्रिया विधीसाठी दोन स्वतंत्र जेट्टी उभारण्यात आलेल्या आहेत.

हे गाव समुद्राला लागून आहे. सागरी मंडळाच्या परवानगीने हा खडक फोडण्यात आला असून त्या ठिकाणी पावसाळ्यात लागणारी सुकी मासळी सुकवली जात आहे. या गावात मासळी खरेदी करण्यासाठी सकाळ संध्याकाळ खवय्यांची मोठी झुंबड उडत असल्याचे दिसून येते. त्यामुळे वाहनतळाची मोठी समस्या या गावाला सतावत होती. एकाच वेळी १०० वाहने उभी राहू शकतील असे वाहनतळ उभारण्यात आले आहे. यापूर्वी मासळी विक्रेत्या काही बंद बाजार इमारतीत तर काही कोळीण रस्त्यावर मासेविक्री करीत होत्या. त्यामुळे सर्व सेवासुविधांयुक्त असे अद्ययावत ९० गाळ्यांचे मासळी व भाजी मार्केट बांधण्यात आले आहे. त्यामुळे या गावाच्या सीमेवर गेली अनेक वर्षे उघडयावर भरणारा मासळी बाजार आता पूर्णपणे बंदिस्त इमारतीत होईल.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची स्मार्ट व्हिलेज व विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांची गाव दत्तक योजनेची अंमलबजावणी आपल्याही शहरात व्हावी अशी इच्छा होती. त्यामुळे मच्छीमार बांधवांचे गाव असलेल्या दिवाळे गावाची यासाठी निवड करण्यात आली आहे. गेली अनेक वर्षे प्रलंबित असलेल्या सुविधा निर्माण केल्या जाणार आहे. नवी मुंबईतील सर्व गावे अशी नियोजित व्हावीत अशी अपेक्षा आहे.**

**-मंदा म्हात्रे, आमदार, बेलापूर**

# पनवेल मनपातर्फे विद्यार्थ्यांमध्ये सौरऊर्जेविषयी जनजागृती

**पनवेल : प्रतिनिधी**

माझी वसुंधरा उपक्रमाअंतर्गत सौरऊर्जेची माहिती देणारा कार्यक्रम सोमवारी (दि. २८) पनवेलमधील कोळीवाड्यातील महापालिकेच्या कोळेश्वर विद्यामंदिर, शाळा क्रमांक ४ येथे घेण्यात आला. नेव्ही ब्ल्यू एनर्जीचे हिरेन सुतार यांनी या वेळी शालेय विद्यार्थ्यांना सौरऊर्जेचे महत्त्व सांगितले.



पनवेल महानगरपालिकेमध्ये माझी वसुंधरा उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमांतर्गत आज कोळेश्वर विद्यामंदिर येथे सहावी आणि सातवीच्या मुलांना सौरऊर्जे पासून विद्युत ऊर्जा तयार करणे, सौरऊर्जेची कार्यतत्वे, सोलार पॅनेलची माहिती, सौरऊर्जेचे पर्यावरणाच्या दृष्टीने होणारे फायदे, विविध ठिकाणी त्याचा उपयोग करून वीज बिल कशा पध्दतीने कमी करता येऊ शकते हे उदाहरणासहित पटवून सांगितले. सौरऊर्जेविषयीची ही माहिती पॉवरपाईंट प्रेझेंटेशनच्या माध्यमातून मुलांना देण्यात आली.

या कार्यक्रमात मुलांनी आपल्या मनातील विविध शंका विचारून त्याचे निरसन केले. या कार्यक्रमासाठी उपायुक्त कैलास गावडे आणि शिक्षणाधिकारी बाळासाहेब चिमणे यांचे सहाकार्य लाभले. या वेळी कोळेश्वर विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका सुमन हिलम, शिक्षिका, विद्युत विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

# नवी मुंबईत महिलांसाठी मॅंग्रोव्हेथॉन

## अमृता फडणवीस यांची उपस्थिती; खारफुटीच्या संवर्धनासाठी पुढाकार

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

खारफुटीच्या संवर्धन आणि संवर्धनाच्या दिशेने आणखी एक पाऊल पुढे टाकत ऐरोलीमधील इनरव्हील क्लब आणि मॅंग्रोव्हज फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ऐरोलीतील महिलांसाठी मॅंग्रोव्हेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी याठिकाणी अमृता फडणवीस यांची उपस्थिती होती.

मॅंग्रोव्हेथॉनमध्ये ३ किमी ५ किमी आणि १० किमी गटात मुंबई आणि नवी मुंबईतील अनेक शाळांमधील विद्याथ्यांनी सहभाग घेतला होता. खारफुटीच्या संवर्धनाच्या दिशेने इनरव्हील क्लब आणि मॅंग्रोव्हज फाऊंडेशन स्तूत्य उपक्रम हाती घेतलाय.

पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी अनेक समाजसेवी संस्था पुढे येतात. पर्यावरणाच्या संवर्धनासाठी विविध उपक्रमही राबवले जातात. खारफुटी वाचवण्यासाठी ऐरोलीमधील इनरव्हील क्लब आणि मॅंग्रोव्हज फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ऐरोलीतील महिलांसाठी मॅंग्रोव्हेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी याठिकाणी अमृता फडणवीस यांची उपस्थिती होती. मॅंग्रोव्हेथॉनमध्ये ३ किमी, ५ किमी आणि १० किमी गटात मुंबई आणि नवी मुंबईतील अनेक शाळामधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या वेळी खारफुटीच्या संवर्धनासाठी आणखी लोकांनी पुढे येण्याचे आवाहन करण्यात आले. तर यासाठी विविध उपक्रमाच्या माध्यमातून आपण खारफुटीचे संवर्धन करू शकतो, असेही मान्यवरांनी बोलून दाखवले.



विधानसभेतील विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. या वेळी त्यांनी या सारख्या उपक्रमांची सध्या अधिक गरज असल्याचेही बोलून दाखवले. फ्लेमिंगो सिटी म्हणून प्रसिद्ध असलेल्या नवी मुंबईतील समुद्राच्या तळावर पसरलेल्या खारफुटीला प्रोत्साहन देणे ही काळाची गरज आहे, असेही अमृता फडणवीस या वेळी म्हणाल्या.

सध्या ग्लोबल वार्मिंगची चिंता वाढते आहे. वाढत्या ग्लोबल वार्मिंगची डोकेदुखी दिवसागणिक वाढत चालली आहे. यावर देशासह जागतिक स्तरावर विचारमंथन वेळोवेळी केले जाते, मात्र ग्लोबल वार्मिंगचा वाढता धोका लक्षात घेता निसर्गाचे संवर्धन करणे गरजेचे आहे. रोज वाढणारी सिमेंटची जंगल पाहता निसर्ग संवर्धनाचे सोडाच आपण सिमेंटचे जंगल दिवसागणिक वाढवत असल्याचे दिसतेय. यातच ऐरोलीमधील इनरव्हील क्लब आणि मॅंग्रोव्हज फाऊंडेशनने खारफुटीच्या संवर्धनासाठी एक पाऊल पुढे टाकलेय.



**पनवेल : महापालिका क्षेत्रातील प्रभाग १८ मधील बिरमोळे हॉस्पिटललगत, तसेच स्वामी मार्गावरील आयडीबीआय बँक एटीएमसमोरील व तालुका पोलीस स्टेशनसमोरील ड्रेनेजची झाकणे कुचकामी झाली होती. यामुळे एखाद्या वाहनचालक अथवा पादचारी पडून दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली होती. हा धोका लक्षात घेत भाजपचे नगरसेवक विक्रांत पाटील यांनी त्वरित महापालिका अधिकाऱ्यांशी संपर्क साधून ही झाकणे बदलून घेतली.**

# पत्रकारांसाठी दोन दिवसीय कार्यशाळा; पोक्सो कायद्याची घेतली माहिती

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

प्लान इंटरनॅशनल संस्थेतर्फे पोक्सो व बाल संरक्षण कायद्याविषयी पत्रकारांसाठी दोन दिवसीय यशस्वी कार्यशाळेचे आयोजन लोणावळा येथे केले होते. यात नवी मुंबई, ठाणे आणि रायगड येथील पत्रकारांनी सहभाग घेतला होता



पोक्सो कायदा, बालकांवर होणारे लैंगिक अत्याचार तसेच या विरोधातील उपलबध कायदे व नियम तसेच पोलीस, रुग्णालय ह्यांची जबाबदारी व कर्तव्य याबद्दलची सखोल माहिती प्लान इंटरनॅशनलचे सी. पी. अरुण, सीडब्लूसीचे सदस्य तसेच प्लानचे सल्लागार सतीश शिंदें, प्लानचे तांत्रिक वरिष्ठ सल्लागार तुषार आंचल यांनी दोन दिवसीय कार्यशाळेत दिली. बालविवाह, बालकामगार, महिला व बाल संरक्षण ह्या विषयांवर बातमी करताना पत्रकारांनी घेण्याची खबरदारी, कायद्यातील शिक्षेची तरतूद इत्यादी महत्वाच्या चर्चे त कधी गांभीर्य तर कधी हसतखेळत शारीरिक प्रत्यक्षिकांद्वारे पत्रकारांना अवगत करण्यात आले तसेच सुप्रसिद्ध दिग्दर्शक मीना नाईक यांच्या अभया ह्या महिला अत्याचारविरोधातील लढाईचे अप्रतिम एकपात्री नाटक उपस्थितांचे हृदय हेलावून टाकणारे ठरले. जर्नालिस्ट वेल्फेअर असोसिएशने या कार्यशाळेच्या नियोजनात महत्वाचा सहभाग दिला.

संघटनेचे अध्यक्ष अशोक शेशवरे यांनी कार्यशाळेचे आयोजक प्लानचे सी. पी. अरुण ह्यांचा शाल व श्रीफळ देवून सत्कार केला व भविष्यातील प्लानच्या अश्या सामाजिक उपाक्रमात आमची संघटना सदैव सोबत असेल, अशी ग्वाही दिली. लोणावळा येथे झालेल्या ह्या कार्यशाळेत २५ हुन अधिक पत्रकारांनी अनेक महत्वाच्या मुद्द्याची, नियम, कायदयांची माहिती, सामाजिक भान, पत्रकार कर्तव्ये व अधिकार तसेच प्रभावित महिला व बालक यांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच त्यांना पुन्हा सामाजिक कार्यात आणण्यासाठी उपलब्ध शासन व्यवस्था ह्याबद्दलची माहिती अधिक ज्ञानार्जन देणारी ठरली. प्लानच्या रणरागिणी शुभांगी रणखांबे आणि अदिती पांडे यांनी कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनात मोलाची भूमिका पार पाडली.

# वाहनांमधून डिझेलची चोरी करणारे दोन जण गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल जवळील गव्हाण फाटा परिसरात उभे असलेल्या वाहनांमधून डिझेलची चोरी करणाऱ्या दोघा जणांना पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

गव्हाण फाटा परिसरात असलेल्या कंपन्यांच्या साईटमध्ये उभ्या असलेल्या वाहनांच्या टाकीचे झाकण तोडून बेकायदेशीररित्या डिझेलची चोरी होत असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक महादेव दळवी, हवालदार नितीन वाघमारे, अविनाश गथंडे, महेश पाटील, अशोक राठोड, भगवान साळुंखे, संतोष मिसाळ आदींच्या पथकाने या ठिकाणी सापळा रचून आरोपी अहमद अब्दुल रहीम सय्यद (२९) व त्याचा सहकारी अशोक म्हस्के (२६) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून जवळपास ३७ हजार रुपये किमतीच्या चोरीच्या डिझेलही हस्तगत करण्यात आले आहे.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : १४

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. भारतातील सर्व विमान कंपन्यांकडे सध्या किती विमाने आहेत?**

अ.) १०१० आ.) ७१० इ.) ५१० ई.) ३१०

**२. रिझर्व बँक ऑफ इंडियाने अलीकडेचबंगळूर येथे रिझर्व बँक इनोवेशन हबची स्थापना कोणत्या उद्देश्याने केली आहे?**

अ.) डिजिटल व्यवहार वाढण्यासाठी आ.) बँकेतील गैरव्यवहार रोखण्यासाठी इ.) आर्थिक सेवा आणि उत्पादने गरीबांपर्यंत पोचण्यासाठी ई.) क्रेडीट कार्डचा वापर वाढण्यासाठी

**३. भारताचा हा शेजारी देश सध्या अतिशय गंभीर आर्थिक संकटात सापडला आहे.**

अ.) बांगलादेश आ.) नेपाळ इ.) भूतान ई.) श्रीलंका

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# हवेत बांधलेली घरे

महाराष्ट्राच्या विधिमंडळात जनतेच्या सेवेत गुंतलेल्या आमदारांसाठी कायमस्वरूपी ३०० घरे बांधण्याची घोषणा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी केली, परंतु त्यातील फोलपणा लगेचच उघड झाला हे बरेच झाले. महाराष्ट्रातील काही आमदारांना मुंबईत घरे मिळत नाहीत ही वस्तूस्थिती आहे, परंतु घराची खरोखर निकड असलेल्या अशा आमदारांची संख्या हाताच्या बोटांवर मोजण्याइतकी निघेल.

**मुख्यमंत्र्यांनी गेल्या २९ महिन्यांमध्ये डझनावारी घोषणा केल्या. त्या जवळपास सगळ्याच घोषणा केव्हाच हवेत विरून गेल्या आहेत. त्यापैकी काही घोषणा किंवा आश्वासनांचे फक्त मुख्यमंत्र्यांनाच नव्हे तर मतदारांना देखील विस्मरण झाले आहे. शेतकऱ्यांना बांधावर जाऊन मदत करण्याची घोषणाही या प्रकारचीच. महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर शेतकऱ्यांसाठी ५० हजार रुपयांचे अर्थसाह्य देण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी तात्काळ केली होती. हे सरकार सत्तेसाठी का होईना पण शेतकऱ्यांवर सवलतींचा वर्षाव करेल असे वाटले होते, परंतु साराच प्रकार बोलाचा भात आणि बोलाची कढी या म्हणीनुसार चाललेला दिसतो. जी गोष्ट कधीच प्रत्यक्षात येणार नाही अशा असंख्य गोष्टी नुसत्या बोलायला काय हरकत आहे, लोकांची स्मरणशक्ती क्षीण असते. कालांतराने गंभीर बाबीदेखील मागे टाकून जनजीवन पुढे सुरू राहते. समाजाच्या याच वृत्तीमुळे काही राजकीय पुढाऱ्यांचे फावते. निवडणुकांच्या वेळी आश्वासनांचा आणि वचननाम्यांचा पाऊस पडतो, त्यामागे लोकांची विस्मरणशक्ती हेच कारण आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनात महाराष्ट्रातील आमदारांसाठी तब्बल ३०० घरे बांधण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली खरी, परंतु त्याचे पुढे हसेच झाले आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे महाविकास आघाडीचे शिल्पकार शरद पवार यांनाच ही योजना आवडलेली नाही. शासकीय कोट्यातून आमदारांना घरे द्यावीत अशी सूचना त्यांनी केली आहे. ती योग्यच म्हणावी लागेल. राज्याच्या विधिमंडळात जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी येणाऱ्या आमदार-नामदारांची आर्थिक स्थिती उत्तम असते हे वेगळे सांगायची गरज नाही. कित्येक आमदार तर कोट्याधीश आहेत. त्यांना मुंबईतील घराची बिलकुल गरज नसते. माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांची मुलगी आमदार प्रणिती शिंदे यांनीदेखील आमदारांना घराची गरज नसल्याचे स्वच्छपणे सांगून टाकले हे एका अर्थी बरेच झाले. निवडणुकांमध्ये अपरंपार खर्च करून निवडून येणाऱ्या आमदारांना मुंबईत राहायला छप्पर नाही यावर महाराष्ट्रातील शेंबडे पोरगे तरी विश्वास ठेवेल काय? मुख्यमंत्री ठाकरे यांनी कायमस्वरूपी ३०० घरे बांधण्याची योजना जाहीर केली, तेव्हा सभागृहातच अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या. दुसऱ्याच दिवशी गृहनिर्माण मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी ही घरे फुकट मिळणार नसून जमीन आणि बांधकामाचा खर्च आमदारांकडून वसूल केला जाईल असा खुलासा केला. या योजनेतील निम्मी अधिक हवा तेथेच निघून गेली. मुख्यमंत्र्यांच्या घोषणेवर अनेक आमदारांनीच नापसंती दर्शवल्याने या योजनेचे पुढे काय होणार हे लक्षात आले होते. असे असताना मुख्यमंत्र्यांनी आमदारांना घरे देण्याची घोषणा कशासाठी केली? असा प्रश्न उपस्थित होतो. गेल्या काही दिवसांत महाविकास आघाडीवर जे पेनड्राइव्ह बॉम्ब फुटत आहेत त्यामुळे १७० आमदारांच्या एकजुटीची चिरेबंदी बांधणी खिळखिळी होऊ लागली आहे. या आमदारांना एकत्र ठेवण्यासाठी काहीतरी मधाचे बोट लावावेच लागणार या विचारातून या भंपक घोषणेची योजना झाली नाही ना, अशी शंका उपस्थित केली जात आहे.**

# आम्हालाही कुणी घर देत का? घर!

**खबरबात**
**महेश शिंदे**



गरीबांच्या वाट्याला झोपडी आणि करोडपती आमदारांसाठी इमले! महाराष्ट्रात आजही ५० टक्क्यांपेक्षा जास्त लोक दारिद्र्य रेषेखाली आहेत. स्वातंत्र्यानंतर या यादीत घट व्हायला हवी होती, मात्र दरवर्षी ही यादी वाढतच जात आहे. मग प्रश्न असा पडतो की, नक्की आर्थिक विकास कुणाचा होत आहे. या यादीतही गरिबांच्या जागांवर पैसेवाल्यांनी डल्ला मारला आहे. सधन लोकांकडेही पिवळे रेशनकार्ड पाहून आश्चर्य वाटायला नको. ४४ हजारांच्या आतील उत्पन्न असणाऱ्यांना अन्नसुरक्षा योजनेखाली मोफत धान्य मिळते. मात्र या यादीतही मोठा घोळ आहे. ज्यांचे खरोखरच उत्पन्न या आर्थिक रेषेखाली असूनही त्यांना या योजनेचा लाभ मिळत नाही. हा लाभ मिळतच नाही. तर काही ठिकाणी या योजनेतून लोकांनी बंगले बांधले आहेत. काही ठिकाणी गरजूंच्या नावाने ही घरे भलत्यांनीच लाटली आहेत. हजारांसाठी हे लोक मतदानदेखील करतात. मात्र त्यांना घरे बांधून द्यावीत, असे आजपर्यंत एकाही लोकप्रतिनिधीला वाटले नाही. रेशन कार्डसह सगळी ओळखपत्रे आहेत म्हणून यांच्या मुलांना नोकरी मिळत नाही, नाइलाजाने यांच्या मुलांना कपडे, भांडी विकणे, कचरा गोळा करणे अशी कामे करावी लागतात. याला जबाबदार कोण? प्रशासन की लोकप्रतिनिधी, मात्र हे लोक स्वतःच्या नशिबाला दोष देत आपले जीवन जगत आहेत.

राज्यातील महाविकास आघाडी सरकारने आमदारांसाठी मुंबईत घरे देण्याची घोषणा केली आहे. कोण आहेत हे आमदार? त्यांची प्रॉपर्टी किती आहे? लाखो रुपयांचा पगार आणि विविध भत्ते घेणाऱ्या आणि अलिशान जीवन जगणाऱ्या करोडपती आमदारांना ही घरे कशासाठी? असा प्रश्न समाजातून आणि सोशल मीडियावर विचारला जात आहे? खरे आहे ते. करोडपती असणाऱ्या या आमदारांना या घरांची







मात्र गावपुढाऱ्यांना हातीशी घेऊन सधन लोकांनीदेखील आपली नावे या अन्नसुरक्षा योजनेच्या यादीत घुसवली आहेत आणि त्यांनादेखील मोफत धान्य मिळत आहे. सरकारच्या योजना जरी गरिबांसाठी होत असतील तरी सदन लोकच यावर डल्ला मारीत आहेत. सरकारकडून देण्यात येणारी मोफत घरे आणि घरकुल योजनेतही मोठा गैरव्यवहार होत आहे. गावात किंवा शहरात दारिद्र्य रेषेखालील असलेल्या कुटुंबाला जर स्वतःचे घर नसेल तर पंतप्रधान आवास योजना जी पूर्वी इंदिरा आवास योजना होती यातून मोफत घर बांधून दिले जाते, मात्र गरजूंना

आजही गावातील आणि शहरातील भटक्या जमातीमधील नागरिकांची ना जागा आहे, ना घरे आहेत. मिळेल तिथे झोपडी बांधून हे लोक रहात आहेत. काही भटक्या जमातीची लोक शहरात वर्षानुवर्षे राहूनही त्यांना निवारा किंवा घरे मिळत नाहीत. भंगार गोळा करणारे, गावोगव कपडे विकणारे, भांडी विकणारे, मेंढपाळ, वंजारी, वडार, लोहार असे अनेक लोक आजही उघड्यावर संसार चालवित आहेत. यांना घरे कधी मिळणार? हे त्यांनादेखील माहित नाही.

महाडमध्ये म्हाडाच्या जागेवर अशीच काही कुटुंबे जवळपास ३० वर्षे राहात आहेत. म्हाडाचा घटक विभाग समजल्या जाणाऱ्या कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने महाडमधील नवेनगर भागात गरिब व अल्प उत्पन्न गटांसाठी घरांसाठी प्लॉट विकसित केले होते. मात्र त्यातील एकही घर, प्लॉट गरिब लाभार्थ्यांना मिळालेला नाही. भांगार गोळा करणारे व भांडी विकाणाऱ्या मुस्लिम भटक्या जमातीमधील काही कुटुंबांनी याच जागेवर झोपड्या बांधून आपले संसार थाटले आहेत. त्यांच्याकडे आधार कार्ड आहे, केशरी रेशन कार्ड आहे, मतदान ओळखपत्र आहे. विषेश म्हणजे प्रत्येक निवडणुकीत स्थानिक लोकप्रतिनिधी या लोकांकडे मतदान मागण्यास जातात आणि काही तरी या लोकांना घर का मिळू शकत नाही? त्यांच्या झोपडीत पाणी नाही, दुसऱ्याकडून भिक मागून पाणी घ्यावे लागते. झोपडीत लाईट नाही, तरीही त्यांची मुले शिकत आहेत. काट्याकुट्या जमवून चूल पेटवली जाते, त्यावर त्यांचे जेवण तयार होते. २२ जुलैच्या पुरात तर त्यांचे काहीच शिल्लक राहिले नाही. तरीही कोणत्याच मदतीची वाट न पाहता येथील लोकांनी आपल्या झोपड्या पुन्हा उभारल्या. पुरात अनेक लोकांना सरकार आणि समाजसेवी संस्थांकडून घरे बांधून मिळाली, मात्र यांच्या झोपड्यांवर साधे प्लास्टिकसुद्धा कोणी टाकले नाही. शिक्षण कमी काय गरज? खरी घरांची गरज या गरीब झोपडीत राहणाऱ्यांना आहे. पण हे समजतंय कुणाला? जो तो आपल्या झोळ्या भरायला लागला आहे. पाच वर्षे आहेत, पुढे निवडणून येऊ की नाही माहित नाही. त्यांना ही करोडोंची घरे दिली जात आहेत. गोरगरिब झोपडपट्टीवासीयांसाठी बांधलेले फ्लॅट पुढारी आणि मंत्र्यांचे नातेवाईक लाटत आहेत.

भ्रष्टाचारी नेते आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी जर सरकारच्या योजना लाटायच्या म्हटल्या तर गरीबांना काय मिळणार? त्यांनी आयुष्यभर असेच उघड्यावर जगावे का? असा प्रश्न प्रकर्षाने समोर येत आहे.

# पोलादपूर तालुक्यातील ४२ शिक्षकांची माहिती चौकशीसाठी रायगड जिल्हा परिषदेकडे

**पोलादपूर : प्रतिनिधी**

प्राथमिक शिक्षक भरती गैरव्यवहारप्रकरणी चौकशीसाठी पोलादपूर तालुक्यातील ४२ शिक्षकांची माहिती रायगड जिल्हा परिषदेकडे पाठविण्यात आली असल्याची माहिती गटशिक्षणाधिकारी सुभाष साळुंखे यांनी दिली.

राज्यात २०१९ मध्ये झालेल्या शिक्षक पात्रता परीक्षेला तीन लाख ४३ हजार २८४ परीक्षार्थी बसले होते. त्यापैकी १६ हजार ७०५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यातील सात हजार ८८० जण लाच देऊन परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे समोर आले. हे प्रकरण पुणे पोलिसांकडून उघड झाल्यानंतर २०१९ आधीच्या शिक्षक भरतीवर पुणे पोलिसांकडून संशय व्यक्त करण्यात आल्याने २०१४ पासून संशय असलेल्या शिक्षकांची चौकशी केली जात आहे. या प्रकरणामध्ये रायगड जिल्ह्यातील काही शिक्षक लाच देऊन पास झाले असल्याचे उघड झाले आहे. या कारणास्तव रायगड जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील सर्व शिक्षकांची महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा प्रमाणपत्रे आणि २३ फेब्रुवारी २०१३ नंतर सेवेत रुजू झालेल्या प्राथमिक तसचे उच्च प्राथमिक शिक्षकांची माहिती सर्व तालुका गटशिक्षणाधिकाऱ्यांकडे मागितली आहे. यामध्ये माध्यमिक शिक्षकांच्या शैक्षणिक पात्रता अथवा मान्यताप्राप्त विद्यापिठ नसलेल्या प्रमाणपत्रांच्या बोगस असण्याची माहिती मागविली नसल्याने तालुक्यातील बोगस माध्यमिक शिक्षकांना या वेळीतरी अभय मिळाल्याचे गटशिक्षणाधिकारी साळुंखे यांनी स्पष्ट केले.

**“बोगस शिक्षकांच्या चौकशीसाठी पोलादपूर तालुक्यातील एकूण ४२ प्राथमिक शिक्षकांचे प्रमाणपत्रे रायगड जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आली आहेत.**

**-सुभाष साळुंखे, गटशिक्षणाधिकारी, पोलादपूर**

# कर्जतमधील दिव्यांगाला तीनचाकी सायकलची भेट

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील पाथरज नागेवाडी येथील कायमचे अंपगत्व आलेल्या आदिवासी बांधवाला नालासोपारा येथील सामजिक बांधिलकी संस्थेने तीनचाकी सायकलची भेट दिली. त्यामुळे नऊ वर्षे घरात खितपत पडलेल्या या दिव्यांगाला बाहेर फिरता येणार आहे.

कर्जत तालुक्यातील नागेवाडी येथील जना चांगो कांबडी (वय ४७) या आदिवासी बांधवाला २०१४ साली विजेचा शॉक लागून अपघात झाला होता. त्यात मणक्याला आघात झाल्याने ते कमरेखाली पूर्णतः लुळे पडले आहेत. त्यांना कायमचे अपंगत्व आले असून ते अंथरुणावर खिळून आहेत. काही दिवसांपूर्वी त्यांना दानशूर व्यक्तींनी बेड, मट्रेस तसेच व्हीलचेअर उपलब्ध करून दिली. त्याचप्रमाणे नालासोपारा येथील सामाजिक बांधिलकी संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र कामेरकर यांनी त्यांना तीनचाकी सायकल भेट दिली. या वेळी संस्थेचे पदाधिकारी शेखर पेणकर, महेश पेणकर, सामाजिक कार्यकर्ते दीपक बोराडे, भागूचीवाडी शाळेचे मुख्याध्यापक हरिचंद्र आढारी उपस्थित होते.



(छाया : संतोष पेरणे)

# पेणमध्ये एकनाथ षष्ठी उत्सव भक्तिभावाने साजरा

**पेण : प्रतिनिधी**

पेण दातार आळीतील मंगलवन संस्थानच्या आबा महाराज परांजपे साधनाश्रमात संत श्री एकनाथ षष्ठी उत्सव संस्थानचे अध्यक्ष शरद मोरे यांच्या मार्गदर्शनाख़ाली मोठ्या भक्तीभावाने व उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

संत श्री एकनाथ षष्ठीनिमित्त साधनाश्रमात बुधवारी सकाळी पूजा, अभिषेक, हरिपाठ, हरिभक्त अथर्व घाटे (पेण) यांचे प्रवचन, आरती, प्रसाद, कीर्तन, भावपुष्पांजली, हरीगजर आदी कार्यक्रम झाले. सायंकाळी संत श्री एकनाथ महाराज व सद्गुरु स्वामी आबा महाराज परांजपे यांच्या प्रतिमांची पेण शहरात सवाद्य पालखी मिरवणूक काढण्यात आली. पेण, पाली, खोपोली परिसरातील भाविकांसह वारकरी या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# मुरूड-अलिबाग मेडिकल असोसिएशनचे वार्षिक अधिवेशन उत्साहात

**मुरूड : प्रतिनिधी**

रुग्णांची सेवा करत असताना जो आनंद मिळतो तो ईश्वराच्या पुजेप्रमाणे असतो. अलिबाग-मुरूड मेडिकल असोसिएशन या संस्थेचे डॉक्टर्स रुग्णांची सेवा करतात, असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष डॉ. मयूर कल्याणी यांनी येथे केले.

मुरूड-अलिबाग मेडिकल असोसिएशनचे ॲमेकॉन वार्षिक अधिवेशन मुरूड येथे आयोजित करण्यात आले होते. त्यात डॉ. मयूर कल्याणी बोलत होते. आपल्या संस्थेला स्वतःचे एक कार्यलाय असावे, जेणेकरून त्या कार्यालयामधून समाजसेवा घडू शकेल, असे मत डॉ. कल्याणी यांनी या वेळी व्यक्त केले.

संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. गणेश गवळी, सेक्रेटरी डॉ. राजाराम हुलवान, खजिनदार डॉ. अमित बेनकर, तसेच डॉ. ज्ञानदा फणसे, तसेच डॉ. दिलीप जैन, डॉ. रेहाना घट्टे, डॉ. संदेश पाटील, डॉ. भाविका कल्याणी, डॉ. मकरंद आठवले, डॉ. आशिष भगत, डॉ. खानावकर, डॉ. अनघा भगत, डॉ. रवी म्हात्रे, डॉ. राजेंद्र मोकल, डॉ. संजय पाटील , डॉ. राज कल्याणी यांच्यासह १६५ डॉक्टर आपल्या परिवारासह या वार्षिक अधिवेशनाला उपस्थित होते. या वेळी संस्थेने विविध खेळाचे आयोजन केले होते. त्यातील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.





(छाया : संजय करडे)





# माथेरानमधील मोफत आरोग्य तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**माथेरान : प्रतिनिधी**

येथील मुस्लिम जमात माथेरान आणि मॉडर्न एज्युकेशनल, सोशल अँड कल्चरल ऑर्गनायझेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मदरसा मोहम्मदिया मुस्लिम मोहल्ला माथेरान येथे रविवारी (दि. २७) मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या शिबिरात डॉ. अलमास खान, डॉ. शाहजीन मापारी, डॉ. फरीदा, डॉ. शिरीन पठाण, डॉ. मोज़म मोमीन, कुतूबुद्दीन शेख, इरम शाह, फायका शेख, कादर खान, फैसुद्दीन शेख आदींनी सुमारे २०० हून अधिक महिलांची आरोग्य तपासणी केली.

## आरोग्य प्रहर

# उन्हाळ्यात बर्फाचे पाणी पिणे योग्य की अयोग्य?

उन्हाळा जोरात सुरू आहे, त्यामुळे भरपूर पाणी आणि पेय पिणे आरोग्यासाठी फायदेशीर आहे. कडक सूर्यप्रकाश आणि वाढता पारा यामुळे लोक तहान शमवण्यासाठी फ्रीजचे थंड पाणी पितात. थंड पाणी तहान शमवण्यासाठी आणि शरीराला हायड्रेट ठेवण्यासाठी उपयुक्त ठरते, पण काही लोकांचा असा विश्वास आहे, की तहान शमवण्यासाठी थंड पाणी पिणे चांगले नाही. उन्हाळ्यात थंड पाणी पिणे शरीरासाठी फायदेशीर आहे की हानिकारक आहे हे तज्ज्ञांकडून जाणून घेऊया.



### पाणी पिण्याचे फायदे

पाणी पिणे आरोग्यासाठी फायदेशीर आहे. पाण्याचे सेवन केल्याने पचनक्रिया सुधारते आणि चयापचय वाढतो. पाण्यामुळे शरीराचे तापमान सामान्य राहते, पाण्यामुळे डिहाइड्रेशन टाळता येते आणि अनेक प्रकारच्या समस्यांपासून सुटका होते. तसेच पूरेपूर प्रमाणात पाणी प्यायल्याने त्वचा तजलेदार होते.

### थंड पाणी पिणे टाळावे का?

मसिना हॉस्पिटलचे सल्लागार पल्मोनोलॉजिस्ट डॉ. सोनम सोलंकी यांच्या मते, साधारणपणे आपल्या शरीराचे तापमान ३७ डिग्री सेल्सिअस असते, त्यामुळे आपण थंड पाणी प्यायल्यास, शरीर ऊर्जा खर्च करून हे तापमान नियंत्रित करू शकते. सोप्या भाषेत सांगायचं झाल्यास थंड पाण्यामुळे शरीरात असंतुलन होऊ शकते आणि पचनक्रिया मंदावते. जेवताना थंड पाणी प्यायल्यास आपले शरीर शरीराचे तापमान नियंत्रित करणारी ऊर्जा वापरण्यास सुरुवात करते, जी पचन आणि पोषक द्रव्ये शोषण्यासाठी वापरली जाते. त्यामुळे जेवताना थंड पाणी पिणे टाळावे. कारण यामुळे घसा खवखवणे आणि नाकाचा त्रास होऊ शकतो. २०१२ मधील एका अभ्यासानुसार, व्यायामादरम्यान थंड पाणी पिणे शरीराला जास्त गरम होण्यापासून दूर ठेवण्यास मदत करते. थंड पाणी पिण्याने व्यायाम चांगला होतो.

### गरम पाणी हा एक चांगला पर्याय आहे का?

आयुर्वेदिक डॉक्टर दिक्षा भावसार यांच्या मते बर्फासारखे थंड पाणी पिणे टाळावे. थंड पाणी पिण्याऐवजी खोलीच्या तापमानानुसार कोमट पाणी प्यावे. गरम पाणी पिण्याचे अनेक फायदे आहेत, पण याचा अर्थ असा नाही की थंड पाण्यामुळे आरोग्याला हानी पोहोचते. खोलीच्या तापमानानुसार पाणी प्यायल्याने आरोग्याला फायदा होतो. पाणी शरीराला हायड्रेट ठेवते तसेच शरीराला ताजेतवाने वाटते. पाणी तुमची पचनसंस्था आणि आरोग्य बिघडवते असे तुम्हाला वाटत असल्यास, तुम्ही डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

# पंजाब बंगळुरूवर पडली भारी

## पाच गडी राखून दणदणीत विजय; शाहरुख खान आणि ओडेन स्मिथची विजयी खेळी

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलच्या १५ व्या हंगामातील तिसऱ्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि पंजाब किंग्ज यांच्यात जोरदार लढत झाली. बंगळुरूने २०६ धावांचे उभे केलेले आव्हान पंजाबने स्वीकारून पाच गडी राखत दणदणीत विजय मिळवला.

पंजाबसमोर २०६ धावांचे तगडे आव्हान उभे करण्यासाठी बंगळुरूचा कर्णधार फाफ डू प्लेसिसने मोठी भूमिका बजावली. त्याने ५६ चेंडूंमध्ये ७ षटकार आणि ३ चौकारांच्या मदतीने ८८ धावा केल्या. मात्र शेवटी बंगळुरुला पराभवाचा सामना करावा लागला. विजयासाठी प्रत्येक फलदांजाचे योगदान बंगळुरूने दिलेल्या २०६ धावांचे लक्ष्य गाठताना पंजाबच्या राज बाजवा वगळता सर्वच फलंदाजांनी चांगली कामगिरी केली.



सलामीला आलेला कर्णधार मयंक अग्रवालने दोन षटकार आणि दोन चौकारांच्या मदतीने अग्रवालने २४ चेंडूंमध्ये ३२ धावा केल्या. तर अग्रवालसोबत सलामीला आलेल्या शिखर धवनने तुलनेने चांगला खेळ करीत २९ चेंडूंमध्ये पाच षटकार आणि एका चौकाराच्या मदतीने संघासाठी ४३ धावा केल्या. हर्षल पटेलने फेकलेल्या चेंडूवर झेलबाद झाल्यामुळे त्याचे अर्धशतक हुकले. तर अशीच स्थिती भानुका राजपक्षे याची झाली. त्याने २२ चेंडूंमध्ये चार षटकार आणि दोन चौकारांच्या मदतीने ४३ धावा केल्या.

यानंतर मात्र लिव्हिंगस्टोन आणि राज बावा यांनी निराशा केली. लिव्हिंगस्टोनने १० चेंडूमध्ये १९ धावा केल्या. तर राज बावा खातेदेखील उघडू शकला नाही. मोहम्मद सिराजने फेकलेल्या चेंडूवर तो बाद झाला, मात्र त्यानंतर शाहरुख खान आणि ओडेन स्मिथ यांनी अनुक्रमे २४ आणि २५ धावा करीत संघाला विजयापर्यंत नेले. शेवटी दोघेही नाबाद राहिले.

पंजाबसमोर २०६ धावांचे तगडे आव्हान उभे करण्यासाठी बंगळुरूचा कर्णधार फाफ डू प्लेसिसने मोठी भूमिका बजावली त्याने ५६ चेंडूंमध्ये ७ षटकार आणि ३ चौकारांच्या मदतीने ८८ धावा केल्या. डू प्लेसिससोबत सलामीला आलेला अनुज रावत फार काळ मैदानावर टिकू शकला नाही. त्याने २० चेंडूंमध्ये एक षटकार आणि दोन चौकारांच्या मदतीने २१ धावा केल्या. राहुल चहरच्या चेंडूवर त्याचा त्रिफळा उडाला. शाहरुख खानने डू प्लेसिसचा झेल झेलला. डू प्लेसिस बाद झाल्यानंतर दिनेश कार्तिक फलदांजीसाठी मैदानात उतरला. नंतर कोहली आणि कार्तिक यांनी चांगला खेळ करत संघाला २०५ धावांपर्यंत नेऊन पोहोचवले.

कार्तिकने १४ चेंडूंमध्ये तीन षटकार आणि तीन चौकार यांच्या मदतीने ३२ धावा केल्या. तर दुसरीकडे पंजाबच्या एकाही गोलंदाजांने चांगली कामगिरी केली नाही. ओडेन स्मिथने चार षटके टाकली. यामध्ये त्याला एकही बळी मिळाला नाही, मात्र त्याने चार षटकांत सर्वांत जास्त म्हणजेच ५२ धावा दिल्या. तर राहुल चहर आणि अर्षदीप सिंग यांनी बंगळुरूच्या प्रत्येकी एका गड्याला बाद केले.

# मुंबई इंडियन्सने घरच्या मैदानावर पहिलाच सामना गमावला

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलच्या पहिल्याच सामन्यामध्ये रविवारी (दि. २७) दिल्ली कॅपिटल्सने मुंबई इंडियन्सवर चार गडी आणि दहा चेंडू राखून घरच्याच मैदानावर मुंबई इंडियन्सला धूळ चारली. ललित यादवने ३८ चेंडूंमध्ये केलेल्या ४८ धावा आणि अक्षर पटेलने १७ चेंडूंमध्ये केलेल्या ३८ धावांच्या खेळीच्या जोरावर दिल्लीने हा विजय मिळवला. मुंबईथील ब्रेबॉर्नवर झालेल्या लढतीमध्ये मुंबईने दिलेले १७८ धावांचे आव्हान दिल्लीने १८.२ षटकांमध्ये पूर्ण केले. मात्र पराभवाबरोबरच कर्णधार रोहितला १२ लाखांचा फटकाही या सामन्यामुळे बसला.

प्रथम फलंदाजी करताना मुंबईने २० षटकांमध्ये ५ बाद १७७ अशी धावसंख्या उभारली. मुंबईचे सलामीवीर इशान किशन (४८ चेंडूंमध्ये ८१ धावा) आणि रोहित शर्मा (३२ चेंडूंमध्ये ४१ धावा) अशी दमदार सुरुवात करुन दिली. मात्र कुलदीप यादवने १८ धावांमध्ये तीन गड्यांना बाद करीत मुंबईच्या धावसंख्येला लगाम लावला. दुसरीकडे धावसंख्येचा पाठलाग करताना सलामीवीर पृथ्वी शॉने २४ चेंडूंमध्ये केलेल्या ३८ धावांची खेळी वगळता आघाडीचे फलंदाज अपयशी ठरले. दिल्लीची स्थिती ६ बाद १०४ अशी होती. त्यावेळी मुंबई सामना सहज जिंकेल अशी आशा फॅन्सना होती, मात्र ललित आणि अक्षरने सातव्या गड्यासाठी ७५ धावांची नाबाद फटकेबाजरी करीत दिल्लीला विजय मिळवून दिला.

डॅनियल सॅम्स हा मुंबईचा प्रभावी गोलंदाज आहे. मात्र मुंबईने १७७ धावांचे तगडे आव्हान उभे करूनही सॅम्सच्या खराब खेळामुळे मुंबईला पराभव पत्कारावा लागला. त्याने एका षटकात दिल्लीला तब्बल २४ धावा दिल्या. सॅम्सने टाकलेल्या चार षटकांत त्याने तब्बल ५७ धावा दिल्या. त्याला एकाही खेळाडूला बाद करता आले नाही.



### रोहित शर्माला १२ लाखांचा दंड

या सामन्यामध्ये षटकांची गती कायम न राखल्याबद्दल म्हणजेच स्लो ओव्हर रेटसाठी रोहित शर्माला दोषी ठरवत त्याला १२ लाखांचा दंड करण्यात आला आहे. अशा पद्धतीची चूक रोहितकडून प्रथमच घडली. मात्र पहिल्याच सामन्यामध्ये असा दंड झाल्यामुळे या पुढील मालिकेमध्ये मुंबई इंडियन्सला अधिक सावध राहावे लागणार आहे.

# स्विस खुली बॅडमिंटन स्पर्धेत सिंधूला विजेतेपद

## पुरुषांत प्रणॉय उपविजेता

**बॅसेल : वृत्तसंस्था**



भारताची दोन ऑलिम्पिक पदकविजेती बॅडमिटनपटू पी. व्ही. सिंधूने रविवारी (दि. २७) स्विस खुल्या स्पर्धेतील महिला एकेरीचे जेतेपद पटकावले, तर पुरुष एकेरीत भारताच्या एचएस प्रणॉयला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

सलग दुसऱ्यांदा या स्पर्धेच्या अंतिम फेरीत खेळणाऱ्या सिंधूने चौथ्या मानांकित थायलंडच्या बुसानन ओंगबामरुंगफानला २१-१६, २१-८ अशी सरळ गेममध्ये धूळ चारली. गेल्या पर्वात सिंधूला स्पेनच्या ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेत्या कॅरोलिना मरीनने पराभूत केले होते. यंदा मात्र सिंधूने खेळ उंचावत जेतेपदाला गवसणी घातली. तिचा बुसाननवरील हा १७ सामन्यांतील १६ वा विजय ठरला. पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत प्रणॉयला इंडोनेशियाच्या चौथ्या मानांकित जोनाथन ख्रिस्टीने १२-२१, १८-२१ असे पराभूत केले.

# काळसेकर कॉलेजमध्ये मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महानगरपालिका व राज्य शासन यांच्या संयुक्त विद्यमाने अब्दुल रझाक काळसेकर पॉलिटेक्निक कॉलेजमधील प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांची मॅरेथॉन स्पर्धा सोमवारी (दि. २८) उत्साहात पार पडली.

या स्पर्धेला अलिबाग एडीएचएस डॉ. राजेंद्र बावीस्कर, पमपाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, प्राचार्य रिझवान खाटीक, युसुफ मुल्ला, कामोठे येथील वैद्यकीय अधिकारी पद्मिनी येलवे, प्राथमिक आरोग्य केंद्र १ च्या डॉ. रेहाना मुजावर, कळंबोली प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉ. अनिल पाटील, क्षयरोग वरिष्ठ औषधोपचार पर्यवेक्षक वाशिकर, राठोड, पाटोले, धामणगावकर, अर्जुन ठाकूर, वानखेडे, महाराष्ट्र कुळपीडित संघटना सचिव अशोक आंबेकर, गीता सुरंगे, संजीवनी ठाकूर, अनिता सुळ आदी उपस्थित होते.




मुल्ला व डॉ. पद्मिनी येलवे यांनी हिरवा झेंडा दाखवून स्पर्धेला सुरुवात केली. स्पर्धेत ३३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. मिराजून इस्लाम शेख प्रथम, माझिन वारंवडे द्वितीय, झैद शेख याने तृतीय क्रमांक पटकावला.

## जिल्हा अजिंक्यपद चाचणी स्पर्धेत

# उत्कर्ष मंदिर सुहास मंडळ विजयी

**मुंबई : प्रतिनिधी**

उत्कर्ष मंदिर मालाड, सुहास मंडळ यांनी मुंबई उपनगर कबड्डी असोसिएशनने प्रज्ञा क्रीडा मंडळाच्या सहकार्याने आयोजित केलेल्या ३९ व्या जिल्हा अजिंक्यपद चाचणी स्पर्धेच्या किशोर गटात विजयी सलामी दिली.

मालाड येथे झालेल्या किशोर गटाच्या सामन्यात उत्कर्ष मंदिरने कबड्डी स्टार संघाचा ३८-२१ असा पराभव करीत विजयी सलामी दिली. पहिल्या डावात १८-११ अशी आघाडी घेणाऱ्या उत्कर्षने दुसऱ्या डावात देखील जोरदार खेळ करीत हा विजय साकारला. अनुज बबले, श्रावण बडदे याचा खेळ उत्कर्षला विजय देऊन गेला. कबड्डी स्टारच्या आयुष जाधव, ऋषिकेश घनावडे यांचा खेळ संघाला विजयी करण्यास कमी पडला.

सुहास मंडळाने हिड इंडिया विद्या निधी संघाला २७-२२ असे चकवित आगेकूच केली. अत्यंत चुरशीच्या या सामन्यातील पूर्वार्धात सुहास मंडळ ११-९ असे आघाडीवर होते, पण शेवटी सुहास मंडळाने ५ गुणांनी बाजी मारली. यलप्पा वडारी, संतोष खुटेकर या विजयाचे शिल्पकार ठरले.

# ठाण्यात खेलो इंडिया बॅडमिंटन प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन

**ठाणे : प्रतिनिधी**

खेलो इंडिया सेंटर्स उभारणीच्या पहिल्या टप्प्यात ठाणे जिल्ह्यामध्ये बॅडमिंटनचे खेलो इंडिया प्रशिक्षण केंद्र येथील दादोजी कोंडदेव स्टेडिअममध्ये सुरू करण्यात आले असून त्याचे उद्घाटन रविवारी (दि. २७) जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांच्या हस्ते झाले. या प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून जिल्ह्यातील गुणी खेळाडूंना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर व्यासपीठ मिळेल, असा विश्वास जिल्हाधिकाऱ्यांनी या वेळी व्यक्त केला.

केंद्र शासनाच्या क्रीडा मंत्रालयामार्फत खेलो इंडिया योजनेतून देशभरातील विविध जिल्ह्यांमध्ये १००० खेलो इंडिया सेंटर्स सुरू करण्यात येत आहेत. पहिल्या टप्प्यात ठाणे जिल्ह्यात बॅडमिंटन खेळाच्या प्रशिक्षणासाठी केंद्र सुरू करण्यात आले असून राज्यातील हे तिसरे, तर मुंबई विभागातील एकमेव केंद्र असल्याचे जिल्हा क्रीडा अधिकारी स्नेहल साळुंखे यांनी सांगितले.



### मोफत प्रशिक्षण आणि किट

या प्रशिक्षण केंद्रासाठी १२ वर्षांच्या आतील मुलामुलींची निवड करण्यात आली असून त्यामध्ये प्रत्येकी १५ मुले आणि मुलींचा समावेश आहे. त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेत्या विघ्नेश देवळेकर यांची निवड करण्यात आली आहे. या मुलामुलींना मोफत प्रशिक्षण दादोजी कोंडदेव स्टेडिअममधील बॅडमिंटन हॉलमध्ये सकाळ आणि संध्याकाळ या दोन्ही सत्रात देण्यात येईल. त्याचबरोबर त्यांना मोफत किटदेखील देण्यात आले आहे.

प्रशिक्षण केंद्रातील खेळाडूंना शुभेच्छा देऊन जिल्हाधिकारी नार्वेकर यांनी सुदृढ आरोग्य आणि व्यक्तिमत्व खेळांतून विकसित होते. पर्यायाने समाज सुदृढ होतो. त्यामुळे मुलामुलींना खेळाची आवड जोपासावी, असे आवाहन केले. ठाणे बॅडमिंटन अकादमीचे संस्थापक श्रीकांत वाड यांनी खेळाडूंना मार्गदर्शन केले. जिल्हा क्रीडा अधिकारी साळुंखे यांनी प्रास्ताविक केले. उद्घाटन समारंभास पर्यटनमंत्री यांचे विशेष कार्य अधिकारी विजय बाविस्कर, ठाणे महापालिकेच्या क्रीडा उपायक्त मीनल पलांडे यांच्यासह क्रीडा प्रशिक्षक, खेळाडू, त्यांचे पालक उपस्थित होते.

# बॅडमिंटनपटू अजय जयरामची निवृत्ती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताच्या अजय जयरामने रविवारी (दि. २७) आंतरराष्ट्रीय बॅडमिंटनमधून निवृत्ती जाहीर करीत दोन दशकांच्या कारकीर्दीला पूर्णविराम दिला.

३४ वर्षीय जयरामने समाजमाध्यमांवर निवृत्तीची घोषणा करताना म्हटले की, मी आज जो काही आहे, त्याचे श्रेय बॅडमिंटनला जाते. या खेळाने माझ्या जीवनाला आकार दिला, मला शिकवले, घडवले आणि मोठी स्वप्ने दिली. याचप्रमाणे आता एमबीए करणार असल्याचेही त्याने म्हटले आहे. सर्व चांगल्या गोष्टींचा शेवट होत असतो. मी माझ्या या कारकीर्दीचा निरोप घेताना अतिशय भावनिक झालो आहे, असे जयरामने म्हटले.



जयरामने डच खुली बॅडमिंटन स्पर्धा दोनदा जिंकली होती, तर २०१५ मध्ये कोरिया खुल्या स्पर्धेचे उपविजेतेपद पटकावले होते.

# रेन्बो प्राईड ऑफ इंडियाचा श्रीनु राठोड मानकरी



**मुंबई : प्रतिनिधी**

हे फाऊंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय पातळीवरील रेन्बो प्राईड ऑफ इंडियाच्या दिमाखदार स्पर्धेत श्रीनु राठोड हा मि. रेन्बो प्राईडचा मानकरी ठरला. तर उपविजेता सय्यद याह्या ठरला. फाउंडेशनच्या संस्थापिका डॉ. संगीता पाटील आणि संचालिका तसेच मिस इंडिया ग्लोबल ब्युटीच्या विजेत्या लावण्या पाटील यांनी या सौंदर्य स्पर्धेचे शानदार आयोजन केले. प्रसिद्ध दंतवैद्यक आणि फॅशन मॉडेल डॉ. सुमाया रेश्मा यांचीही यावेळी उपस्थिती होती. या उपक्रमाबाबत बोलताना डॉ. संगीता पाटील यांनी सांगितले की, हा उपक्रम एलजीबीटी कम्युनिटीबाबत समाजात जागरूकता व्हावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आला असल्याचे आयोजकांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवा यांनी केले.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com